# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 December 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ डिसेंबर २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- राष्ट्रीय पंचायत पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान–महाराष्ट्राला विविध सहा श्रेणीत पुरस्कार
- विकासाच्या दृष्टीने भारताची वाटचाल योग्य मार्गावरून सुरू–सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनमध्ये पंतप्रधानांचे गौरवोद्गार
- संसदेचं कामकाज कालही बाधित–रेल्वे सुधारणा विधेयक लोकसभेत संमत
- परभणी शहर तसंच जिल्ह्यात जमावबंदी आदेश–इंटरनेटसह सर्व दूरसंचार यंत्रणाही बंद

आणि

- लातूर जिल्ह्यात आजपासून क्रीडा सप्ताहाचं आयोजन

****

देशाला विकसित राष्ट्र घडवण्यासाठी गावं तसंच गावकऱ्यांचा विकास आणि सशक्तीकरणाचं महत्त्व अधिक असल्याचं प्रतिपादन, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. राष्ट्रीय पंचायत पुरस्कार २०२४ काल नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आले, त्यावेळी त्या बोलत होत्या. विविध श्रेणींमध्ये एकूण ४५ पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये राज्यात सातारा जिल्ह्यातल्या पाटण तालुक्यातल्या मान्याची वाडी ग्रामपंचायतीला दोन पुरस्कारांनी गौरवण्यात आलं, गोंदिया जिल्ह्यातल्या तिरोडा पंचायत गट, नाशिक जिल्ह्यातल्या इगतपुरी गट अंतर्गत मोडाळे ग्रामपंचायत, भंडारा जिल्ह्यातली बेला ग्रामपंचायत, तसंच पुण्यातल्या यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी–यशदा ला पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

****

विकासाच्या दृष्टीने भारताची वाटचाल योग्य मार्गावरून सुरू असल्याचे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले आहेत. सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनमध्ये सहभागी विद्यार्थ्यांशी ते काल बोलत होते. ते म्हणाले...

***''आप सबसे बात करने के बाद मेरा कॉन्फिडन्स और बढ गया है की देश विकसित भारत होने के सही ट्रॅक पर है। आप जिस तत्परता से, जिस कमिटमेंट के साथ भारत की समस्याओं के इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स ढुंढ रहे है, वो अद्‌भूत है। साथीयों, आज देश की जो एक्सप्रेशन्स है, उसमें हमे हर चुनौती के लिये आऊट ऑफ द बॉक्स सोचना ही होगा।''***

महाराष्ट्राल्या मुंबई, पुणे, नागपूर आणि कोल्हापूरसह देशभरात ५१ केंद्रांवर झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत ८६ हजाराहून अधिक संघ सहभागी झाले.

****

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात कालही दोन्ही सदनांचं कामकाज वारंवार बाधित झालं. राज्यसभेत सत्ताधारी आणि विरोधक यांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांवर गदारोळ होऊन सभागृहाचं कामकाज आधी बारा वाजेपर्यंत आणि त्यानंतर दिवसभरासाठी तहकूब झालं. सभापती जगदीप धनखड यांच्यावर दाखल अविश्वास प्रस्ताव बद्दल संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी विरोधकांवर कडाडून टीका केली. काँग्रेसनं सभापतीपदाचा अनादर केला असून त्यासाठी त्यांनी माफी मागावी, अशी मागणी रिजीजू यांनी केली.

**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स – एआयवर नियंत्रण आणणारा कायदा करण्याचा केंद्र सरकारचा विचार असून, यावर सभागृहाचं एकमत अपेक्षित असल्याचं, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. ते काल लोकसभेत बोलत होते.

यासंदर्भात अन्य एका प्रश्नावर उत्तर देताना वैष्णव यांनी, छत्रपती संभाजीनगर इथं आर्टिफिशिअल इंटेलिजन्स लॅबचं काम सुरु करण्यात येणार असल्याची माहिती दिली. यामुळे सेमी कंडक्टर उद्योगासह शेती उत्पादनाला देखील चालना मिळणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

लोकसभेत काल रेल्वे सुधारणा विधेयक आवाजी मतदानानं संमत झालं. रेल्वे नियम १९८९ मध्ये सुधारणा करण्याची तरतूद या विधेयकात आहे. रेल्वेच्या

कायदेशीर चौकटीचं सुलभीकरण करण्याच्या दृष्टीनं हे विधेयक मांडल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांमध्ये एक लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याची माहितीही वैष्णव यांनी दिली. राज्यात रेल्वेला प्रत्येक स्थानकावर थांबा देण्यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. पुण्याहून रेल्वे मार्गाचं दुहेरीकरण तसंच तिहेरीकरणाचं काम सुरु आहे. त्यानंतर रेल्वे थांबे वाढवण्यात येणार असल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. राज्यात रेल्वेची कामं योग्य रितीने सुरु असल्याचं सुळे यांनी नमूद केलं.

****

ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना संयुक्त राष्ट्रांची पर्यावरण संस्था असलेल्या UNEP चा, चॅम्पियन ऑफ अर्थ जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. पर्यावरणाचं संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्कारानं सन्मानित करण्यात येतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. माधव गाडगीळ यांचं या पुरस्काराबद्दल अभिनंदन केलं आहे.

****

सातारा इथले तिसरे जिल्हा आणि सत्र न्यायाधीश धनंजय निकम यांच्यासह चौघांविरोधात लाचखोरी प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक दयानंद गावडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. फसवणुकीच्या गुन्ह्यातील संशयिताला जामीन मिळवून देण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

****

परभणी इथं घडलेल्या अप्रिय घटनेचे पडसाद पाहता, शहर आणि जिल्ह्यात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी ही घोषणा करत, नागरिकांना शांतता राखण्याचं तसंच कायदा आणि सुव्यवस्थेचं पालन करण्याचं आवाहन केलं..

***''परभणी जिल्ह्यामध्ये आपण कलम १४४, नवीन कलम १६३ प्रमाणे लागू केलेले आहेत. तर सर्व नागरिकांना मी आवाहन करतो की या आदेशाचं पालन करावं.''***

दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी पाच व्यक्ती पेक्षा जास्त व्यक्तींना जमा होण्यास मनाई असून, इंटरनेटसह सर्व दूरसंचार सेवा, झेरॉक्स केंद्र, तसंच ध्वनीक्षेपकं बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

दरम्यान, परवा घडलेल्या संबंधित घटनेनंतर जिल्ह्यात काल आंदोलकांकडून दगडफेक, जाळपोळ तसंच रास्ता रोको करण्यात आल्याने, कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नांदेड परिक्षेत्रचे विशेष पोलीस उपमहासंचालक शहाजी उमाप यांनी घटनास्थळाची पाहणी करून प्रकरणाची दखल घेत, नागरिकांना शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे..

***''मी सर्व आंदोलन करताना यानिमित्ताने आवाहन करतो की त्यांनी कुठलेही कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण न करता आपापल्या घरी जावं आणि या ठिकाणची जी शांतता सुव्यवस्था आहे ती अबाधीत ठेवावी.''***

****

बीड जिल्ह्यात वाढती गुंडगिरी आणि अपहरणाच्या घटनांची केंद्रीय अन्वेषण विभाग-सीबीआय मार्फत चौकशी करण्यात यावी, अशी मागणी बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केली आहे. काल दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची सोनवणे यांनी भेट घेऊन ही मागणी केली. याविषयावर तातडीने ठोस पावलं उचलण्याचं आश्वासन केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिल्याचं खासदार सोनवणे यांनी सांगितलं.

****

लातूर जिल्ह्यात आजपासून क्रीडा सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. १८ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या सप्ताहाचं आज सकाळी जिल्हा क्रीडा संकुलावर उद्घाटन होईल. या सप्ताहात जिल्ह्यात विविध ठिकाणी विविध स्पर्धा होणार आहेत, यामध्ये धावणे, कराटे, तायक्वांदो, कुस्ती, स्केटिंग, लॉन टेनिस, आट्या-पाट्या, रग्बी, सायकलिंग आदी स्पर्धांचा समावेश आहे. जिल्ह्यातल्या अधिकाधिक खेळाडूंनी या स्पर्धेत सहभागी होण्याचं आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांनी केलं आहे.

****

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघांतली तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका ऑस्ट्रेलियानं तीन शून्यने जिंकली आहे. काल ऑस्ट्रेलियात पर्थ इथं झालेल्या अखेरच्या सामन्यात यजमान संघानं भारतीय संघाचा ८३ धावांनी पराभव केला. ऑस्ट्रेलियानं भारतासमोर विजयासाठी ठेवलेल्या २९९ धावांच्या आव्हानाचा

पाठलाग करतांना, स्मृती मंधानाच्या शतकी खेळीनंतरही भारतीय संघ २१५ धावांवर सर्वबाद झाला.

****

नांदेड जिल्ह्यात श्रीक्षेत्र माहूर इथं दत्तशिखर गडावर आजपासून दत्त जयंती उत्सव सोहळ्याला प्रारंभ होत आहे. आज पहिली पालखी निघणार असून, १४ डिसेंबर रोजी दुपारी बारा ते दोन या वेळेत दत्त जन्मोत्सव साजरा होणार आहे. १७ डिसेंबरला काकड आरतीने दत्त जयंती उत्सवाची सांगता होईल. या सोहळ्यानिमित्त एसटीच्या माहूर आगारातून अतिरिक्त बस सोडल्या जाणार आहेत. ठिकठिकाणी आरोग्य पथकं तसंच रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

****

यंदाच्या पावसाळ्यात नैसर्गिक आपत्तीने शेत पिकांच्या झालेल्या नुकसानापोटी राज्य सरकारने निधी मंजूर केला आहे. धाराशिव जिल्ह्यातल्या एक लाख ६३ हजार ९७ हेक्टर क्षेत्रावरील एक लाख ८० हजार ७८६ शेतकऱ्यांच्या शेत पिकांचं नुकसान झाल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाने पाठवला होता, या नुकसानीपोटी २२१ कोटी ८१ लाख ३० हजार रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

नांदेड जिल्ह्यातही सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीसाठी ८१२ कोटी नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. जिल्ह्यातल्या सात लाख ८३ हजार ९१५ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे ही रक्कम थेट जमा करण्यात येणार आहे.

****

जालना इथं मालमत्ता कराचा भरणा न करणाऱ्या औद्योगिक विकास महामंडळातल्या १४ मालमत्ताधारकांना काल महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांनी स्वतः संबंधित ठिकाणी जाऊन जप्तीच्या नोटीस दिल्या. कराचा भरणा न केल्यास पुढील आठवड्यात सर्व मालमत्ता सील करण्यात येणार आहेत.

दरम्यान, शहरातल्या मालमत्ता धारकांनी ३१ डिसेंबर पर्यंत मालमत्ता कर न भरल्यास दोन टक्के प्रति महिना व्याज आकारण्यात येणार आहे. त्यामुळे थकीत कराचा भरणा करावा असं आवाहन महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी केलं आहे.

****